दूरध्वनीक्रमांक:
०२०२५६२१४४०

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

परीक्षा समन्वय कक्ष
गणेशखिंड, पुणे –०७

website : www.unipune.ac.in

e-mail : ar.coordination@pun.unipune.ac.in
sssapp-coord@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा समन्वय/ 162

दिनांक: ०३/०४/२०२५
07/04/2025

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था,
अहिल्यानगर, नाशिक व पुणे,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११००७

विषय – मार्च/एप्रिल २०२५ मध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्राच्या विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी वरिष्ठ पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करणेबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंबंधी कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षकांची नेमणूक संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी करावयाची असून त्याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठास कळवावयाची आहे. या संदर्भात निर्गमित केलेला अध्यादेश क्रमांक ८ (४ ते ९) मधील तरतूदीकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक (Internal Senior Supervisor) नियुक्तीचे निकष पुढील प्रमाणे निश्चित केलेले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करताना प्राधान्याने नियमित शिक्षकांची नेमणूक करावी. वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक होण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयामध्ये अध्यापनाचा किंवा प्रशासकीय कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे किंवा प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असणारा शिक्षकेतर कर्मचारी किमान गट ' ब ' (वर्ग २) मधील असावा.

२. अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करण्यात येणाऱ्या शिक्षकांस किमान विद्यापीठाची शिक्षक मान्यता असणे आवश्यक आहे.

तसेच विद्यापीठाने बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती काही कारणामुळे परीक्षा केंद्रावर येवू न शकल्यास अन्य संस्थेच्या महविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधून त्यांच्या महाविद्यालयातील नियमित शिक्षकास बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून बोलवून घ्यावे व तशी नियुक्ती महाविद्यालय स्तरावर करावी. सदर नियुक्तीचे पत्र प्राचार्यांनी द्यावे व त्याची प्रत विद्यापीठाकडे **sssapp-coord@pun.unipune.ac.in** या ई–मेल वर पाठवावी. ई–मेल पाठवताना **subject** मध्ये **revised ss appointment** असा उल्लेख करावा. अशा प्रकारे महाविद्यालयांनी पर्यायी व्यवस्था म्हणून नियुक्त केलेल्या बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षकास विद्यापीठाकडून वेगळे नेमणूक आदेश दिले जाणार नाहीत. आपणास विनंती करण्यात येते की, विद्यापीठाच्या परीक्षांसाठी वरीलप्रमाणे बहि:स्थ पर्यवेक्षकांच्या नेमणूकीबाबत नियोजन करावे. तसेच अंतर्गत पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या करुन विद्यापीठास परीक्षा सुरळीतपणे पूर्ण करण्यासाठी नेहमीप्रमाणे सहकार्य करावे.

पुढे आपणास असे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील ज्या प्राध्यापकांची विद्यापीठाकडून किंवा इतर महाविद्यालयाकडून बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक केली जाईल त्यांना संबंधित कालावधीसाठी आपल्या महाविद्यालय/ मान्यताप्राप्त संस्थेतून तात्काळ कार्यमुक्त करावे.

प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ